RNI MAHMAR
36829-2010

ISSN- 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay


International Research Journal



UGC-CARE LISTED

Special Issue - I

**Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation**

January 2021



Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi

Executive Editor : Prof. Kartik R. Patil

Principal,
Rashtrasant Tukdoji College, Chimur
Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

Co-Editor : P. M. Rajurwade

Address
'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist- Latur 413515 (MS)

'Akshar Wangmay' UGC Care Listed, International Research Journal, ISSN: 2229-4929, January 2021
Special Issue, Volume I: Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environment, Research, Language &
Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation


| | | |
|---|---|---|
| 47 | नवित साहित्य आणि डाँसरा को ... <br> प्रा. बादलशाहा डोमाजी चव्हाण | [illegible] |
| 48 | औरंगाबादच्या नामांतराचा मुद्दा: महानगरपालिका निवडणुकीपूर्वीचे राजकारण <br> शरद बाबुराव सोनवणे | [illegible] |
| 49 | Covid 19 दशाची जाणीव... <br> Dr. Gavit Madhav Hari | 158-159 |
| 50 | "स्वय सहायता समूह योजना की हितग्राही असेला उपजनजातीय महिलाओं की सामाजिक एव आर्थिक स्थिति का अध्ययन" (म.प्र. के बड़वानी जिले की पानसेमल, निवाली एव सेन्धवा तहसील के विशेष सन्दर्भ में) <br> मोसम्बी सैनानी | 160-162 |
| 51 | कोविड 19 का शहरी जीवन पर पड़ा प्रभाव <br> प्रा.डॉ.दळवे सुर्यकांत माधवराव | 163-164 |
| 52 | कोविड-१९ मुळे भारतासमोर निर्माण झालेली आव्हाने <br> प्रा. डॉ. विक्रमराव नारायणराव पाटील | 165-168 |
| 53 | एकलव्य रेसिडेंशिअल स्कूलामध्ये विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणार्या सोईसुविधा <br> रंगशाम संभाजीमोहक | 169-171 |
| 54 | कोरोना काळातील विविध क्षेत्राचे बदलते रूप <br> प्रा. सतीश एस. कर्णासे | 172-174 |


PRINCIPAL
SHANKARRAO JAGTAP ARTS &
COMMERCE COLLEGE, WAGHOLI
Tal-Koregaon, Dist-Satara.

'Akshar Wangmay' UGC Care Listed, International Research Journal, ISSN: 2229-4929, January 2021
Special issue, Volume-I "Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation"

# कोविड -१९ मुळे भारतासमोर निर्माण झालेली आव्हाने

प्रा. डॉ. विक्रमराव नारायणराव पाटील
शंकरराव जगताप आर्ट्स अँण्ड कॉमर्स कॉलेज, वाघोली, ता.कोरेगाव जि. सातारा ४१५५२५.
ई-मेल - drvikrampatil77@gmail.com

प्रास्ताविक-

२०१९ च्या अखेरीस म्हणजे नोव्हेंबर मध्ये कोरोना व्हायरस चीनमध्ये सापडला. त्यानंतरच्या तीन महिन्यात जगातील १९६ देशांपैकी १७५ देशात ही महामारी अस्तित्वात आली. चीनने कोणतीही तरी स्पष्ट आकडेवारी जगासमोर आणली नाही. अनेक देशांनी लॉकडाऊन सुरू केले. सर्व बाजारपेठा, उद्योग, शाळा, महाविद्यालय, विद्यापीठे बंद ठेवली. विमानसेवा स्थगित केली. अनेक देशांनी राज्यांच्या अंतर्गत सीमा रेषेवर नाकेबंदी केली. अनेक राज्यामध्ये जिल्ह्याबाहेर आदान-प्रदान खूप मर्यादित केले. इटली व अन्य काही देशांनी लॉकडाऊन मध्ये आदेश मोडणाऱ्या नागरिकांना जबरदस्त दंडाची शिक्षा करायला सुरुवात केली श्रीलंका व अन्य काही देशांनी सरकार व प्रशासनावर टीका करणाऱ्यावर कारवाईचे आदेश दिले. शंभर वर्षातील हे जगावर आलेले सर्वात मोठे नैसर्गिक व मानवनिर्मित संकट आहे.

भारतामध्ये सर्वात पहिली कोरोना बाधित व्यक्ती केरळ राज्यातील त्रिशूरमध्ये 30 जानेवारी २०२० रोजी सापडली. जिचा संबंध चीनमधील वुहान प्रांताशी होता. त्यानंतर त्याचा प्रसार देशामध्ये महाराष्ट्र, दिल्ली, आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, गुजरात, पंजाब, हरियाना या प्रदेशात मोठ्या प्रमाणात झाला. त्यामुळे भारत देशासमोर आर्थिक, राजकीय, सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक अशा प्रकारची अनेक मोठी आव्हाने उभी राहिली. ही आव्हाने भारताने पेलून कशा प्रकारे उपाय योजले आहेत. याचा अभ्यास या शोधनिबंधात करणार आहे.

संशोधनाचे उद्देश :

१) भारतासमोरील राजकीय आव्हानांचा अभ्यास करणे.

२) भारतासमोरील आर्थिक आव्हानाचा अभ्यास करणे.

३) भारतासमोरील सामाजिक व सांस्कृतिक आव्हानांचा अभ्यास करणे.

४) भारतासमोरील आरोग्यविषयक आव्हानांचा व उपाययोजनांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

या शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे यामध्ये प्राथमिक व दुय्यम साधनाचा वापर केला आहे. दुय्यम साधनामध्ये 'साधना', योजना समाज प्रबोधन पत्रिका, प्रबोधन प्रकाशन ज्योती, सत्याग्रही या नियतकालिकातील विविध साधनांचा उपयोग केला आहे.

**कोविडमुळे निर्माण झालेली आव्हाने -**

कोरोना महामारीने जगासमोर व मानव जातीसमोर फार मोठे आव्हाने निर्माण केली आहेत. त्यातून बाहेर पडणे पुन्हा नव्याने उभारणी करणे हे सर्व निष्कर्ष समग्र विचार केल्यानंतरच निघतात. या संकटकाळात लाखो व्यक्तींची स्वप्ने धुळीस मिळाली. हजारो कुटुंबाची वाताहत झाली. शेकडो समूह कोलमडून पडले. त्याच काळात संकुचितपणाची परीक्षा झाली. कोरोना नंतरचे जग कसे असेल या बाबतच्या चर्चा सुरू झाली आहे. आव्हाने व संधी याबाबत बोलले जात आहे. वस्तुत: आताचे हे संकट जगभर घोंघावत आहे. मानवजातीच्या ज्ञात इतिहासात या प्रकारची स्थिती पहिल्यांदाच ओढवली आहे. विविध क्षेत्रावर त्याचे परिणाम झाले. कोरानाबाबत कोणतीही भाकिते किती गांभीर्याने घ्यायची हा एकच प्रश्न आहे. 'प्रत्येक क्षेत्रातील विशेषतज्ञ काय म्हणत आहेत, याकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. त्याचे अंदाज किंवा भाकिते किती खरी ठरतील हा भाग आता तरी बाजूला ठेवायला हरकत नाही. पण ते ज्या गृहीतकांच्या आधारावर बोलत वा लिहित आहेत, त्यावर विचार करायला हवा. कारण वैज्ञानिक दृष्टीकोनामध्ये अंतिम निष्कर्षापेक्षा त्या निष्कर्षाप्रत येण्याची प्रक्रिया महत्वाची असते. वैज्ञानिक दृष्टीकोन हा शब्द वापरला जातो, तेव्हा आपल्या नजरेसमोर प्रामुख्याने निसर्ग विज्ञानाच्या विविध शाखा आणि त्यातील सूत्र, तत्व, नियम व सिद्धांत येतात. याचे उघड कारण हे आहे की तिथे मांडले गेलेले ठोस निष्कर्ष सर्वत्र व सर्वकाळ

तपासता येतात. त्याची प्रचीती घेता येते.'[1]

भारतामध्ये २५ मार्च २०२० पासून संपूर्ण देशात टाळेबंदी घोषित केली ती टाळेबंदी सातत्याने वाढविण्यात आली. जून महिन्यापासून त्याचे नियम शिथील करण्यात आले. आजपर्यंत पाहता दहा महिन्याचा कालखंड झाला. सुरवातीच्या कालखंडात लोकांच्या मनामध्ये प्रचंड भिती होती. लोकांना अचानक केलेल्या लॉकडाऊनमुळे शहरात राहणारे कामगार अन्न पाणी रोजगार आणि निवारा यांना पारखे झाले. त्यातील अनेकजण ग्रामीण भागात गेले. लॉकडाऊनच्या काळात करोडो लोक बेरोजगार झाले. बाहेरगावी असणाऱ्या मजुरांचे प्रचंड हाल झाले. देशातील आठ ते दहा कोटी नागरिक आपल्या घरापासून दूर होते. कोणतेही नियोजन न करता लॉकडाऊन केल्यामुळे गंभीर परिणाम गरीब व्यक्तींवर झाले. भारत या देशाचा विचार करता गेल्या दहा महिन्यामध्ये कोविडमुळे मोठी आव्हाने भारतापुढे उभी